(१) 14

शासन ज्ञापन, क्रमांक- एलसीएस-२६०७/३८७/प्र.क्र. ८९/ज-३

जिल्हाधिकारी मुंबई
उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
दिनांक :- 17 APR 2008
आवक क्र :- 8506
संकलन :- III-A
चिटणीस नि.उ.जि. जिल्हाधिकारी

F-281

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक ४ एप्रिल, २००८

**विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा**

मौजे बांद्रा, ता. अंधेरी, स. नं. ३४१, नभूक्र ६२९/१२७५ क्षेत्र १०१९.९३ चौ. मी. हा भूखंड सिंधुरत्न सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांना अंतिमरित्या मंजूर करण्याबाबत...

**पहा :-** १) शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक- एलसीएस-२६०७/३८७/प्र.क्र. ८९/ज-३, दिनांक ८ ऑगस्ट, २००७

**शासन ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक- ११/३ अ/एफ-२८१, दिनांक ५/९/२००७ ला अनुलक्षून विज्ञप्तीपुर्वक कळविण्यात येते की, मौजे बांद्रा, ता. अंधेरी, स. नं. ३४१, नभूक्र ६२९/१२७५ क्षेत्र १०१९.९१ चौ. मी. हा भूखंड सिंधुरत्न सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांच्या मागणीनुसार त्यांना देण्याबाबत शासनाने दिनांक ८/८/२००७ च्या पत्रान्वये यापुर्वी हेतूपत्र दिलेले आहे. आता संस्थेने सदर भूखंड त्यांना अंतिमरित्या मंजूर करण्यासाठी संस्थेच्या सभासदांची माहिती व आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत. सदरचा भूखंड त्या जमिनीची चालू बाजारभावान शिघ्रसिध्द गणकानुसार येणा-या रकमेपैकी, संस्थेच्या सभासदांच्या उत्पन्न गटानुसार सवलतीची किंमत आकारुन येणारी रक्कम वसूल करुन शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- एलसीएस-०६०६/प्र.क्र. ५४/ज-१, दिनांक २५/५/२००७ तसेच क्रमांक- जमीन-१०/२००३/प्र.क्र. ४०१/ज-१, दिनांक २५ जुलै, २००७ मध्ये दिलेल्या अटी/शर्ती तसेच जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी/शर्तीवर तसेच पुढील अतिरिक्त अटीवर सदर भूखंड सिंधुरत्न सहकारी गृहनिर्माण संस्था यांना अंतिमरित्या मंजूर करण्यास तसेच सोबतच्या परिशिष्ठ "अ" मध्ये दिलेल्या संस्थेच्या सभासदांच्या सभासदत्वास अंतिम मान्यता देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

**अटी :-** १) सोबत जोडलेल्या सभासदांच्या यादीतील अ. क्र. १२ येथे नमुद केलेले श्री. चंद्रकांत कृष्णा चव्हाण यांनी रहिवास प्रयोजनासाठी सादर केलेल्या रेशनकार्डवरुन सदर निवासस्थान त्यांचे नावे असून त्यांचे निवासस्थान मुंबई महानगरपालिका क्षेत्रात येते. परंतु श्री. चव्हाण यांनी त्यांचे माहितीमध्ये सदरचे निवासस्थान त्यांच्या आईच्या नावे असल्याचे नमुद केले आहे. परंतु त्यासाठी कागदपत्रे दिलेली नाहीत. सदरची कागदपत्रे सादर करण्याच्या अटीवर त्यांचे सभासदत्व मान्य करण्यात येत आहे.

२) संस्थेमध्ये संस्थेच्या एकूण सदस्य संख्येच्या ३% सदस्य अंध/अपंग प्रवर्गातून समाविष्ट करणे अनिवार्य राहील.

(४१)

३) संस्थेमध्ये भविष्यात समाविष्ट करण्यात येणा-या नविन सभासदांची पात्रता शासनाच्या दिनांक २५/५/२००७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तपासून सभासदांच्या सदस्यत्वास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

२. सदरचे आदेश नगर विकास विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४३९/०७/व्यय-९, दिनांक १८/९/२००७ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( वि. सि. वखारे )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा.
५) महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६) महालेखपाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
७) वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
८) नगर विकास विभाग, नवि-११, मंत्रालय, मुंबई.
९) डॉ. यजूर्वेंद्र व. गवई, मुख्य प्रवर्तक, सिंधुरत्न सहकारी गृहनिर्माण संस्था, नियोजित) व्दारा, ३२, जास्मीन सहकारी गृहनिर्माण संस्था, कालेलकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
१०) ज-३ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

(४१)

**शासन ज्ञापन क्रमांक- एलसीएस-२६०७/३८७/प्र.क्र. ८९/ज-३, दिनांक ४ एप्रिल, २००८**

**सोबतचे परिशिष्ठ "अ"**

| अ.क्र. | सभासदांचे नांव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | डॉ. श्री. यजुर्वेंद्र वसंत गवई, मुख्य प्रवर्तक | अ. जा. |
| २ | श्री. राजन कृष्णा तेली | इ. मा. व. |
| ३ | श्री. सतिश जगन्नाथ सावंत | खुला |
| ४ | श्री. देवदत्त जनार्दन सामंत | खुला |
| ५ | श्री. सुदेश सुबोध आचरेकर | इ. मा. व. |
| ६ | श्री. अजित बाळकृष्ण जांभवडेकर | खुला |
| ७ | ॲड. श्री. संग्राम देसाई | खुला |
| ८ | श्री. अविनाश अशोककुमार शिंदे | अ. जा. |
| ९ | श्री. एस. एस. पाटील | खुला |
| १० | श्री. पांडुरंग प्रल्हाद धुमाळे | इ. मा. व. |
| ११ | श्री. हेमंत हरिश्चंद्र कोटलवार | खुला |
| १२ | श्री. सी. के. चव्हाण | अ. जा. |

( वि. सि. वखारे )
अवर सचिव
महसूल व वन विभाग.

# ाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com


109

**क्रमांक : ११/३ अ/एफ-२८१**
**दिनांक : ७/५/२००८**

**वाचले :** १) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. एलसीएस-२६०७/३८७/प्र.क्र. ८९/ज-३ दिनांक ४/४/२००८.
२) या कार्यालयीन पत्र समक्रमांक दि. ८/४/२००८.
३) संस्थेचे पत्र दिनांक ७/५/२००८.

आदेश

मौजे बांद्रा, ता. अंधेरी स.नं. ३४१, न.भू.क्र. ६२९/१२७५, क्षेत्र १०१९.९३ चौ. मी. हा भुखंड संस्थेस त्या जमीनीच्या चालू बाजारभावाने शिघ्रसिध्दगणकानुसार येणाऱ्या रकमेपैकी, संस्थेच्या सभासदांच्या उत्पन्न गटानुसार सवलतीची किंमत आकारुन येणारी रक्कम वसूल करुन शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलसीएस-०६०६/प्र.क्र. ५४/ज-१ दि. २५/५/२००७ व क्र. जमीन-१०/२००३/प्र.क्र. ४०१/ज-१, दि. २५ जुलै ०७ मधील अटी तसेच जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी/ शर्तीसह काही अतिरिक्त अटीवर अंतिम रित्या मंजूर करण्यास तसेच ज्ञापना सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या संस्थेच्या सभासदांच्या सभासदत्वास अंतिम मान्यता देण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

संस्थेस या कार्यालयाचे पत्र दिनांक ८/४/२००८ अन्वये प्रस्तुत जमीनीची शिघ्रसिध्दगणकाप्रमाणे प्रचलीत बाजारभावानुसार सभासदांच्या उत्पन्न गटाप्रमाणे सवलतीची कब्जेहक्काची रक्कम रु. ९५,४४,५६१/- या कार्यालयात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे नावे रोखीने अथवा पे ऑर्डरने भरणा करणेबाबत कळविण्यात आले होते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये संस्थेस ज्ञापनासोबतच्या जोडपत्रातील १२ सभासदांसह संस्थेची नोंदणी करुन नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करणे व निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांची यादी संस्थेच्या ठरावासह सादर करणे . तसेच जमीन मंजुरीबाबत निर्धारीत करण्यात येणाऱ्या अटी व शर्ती संस्थेस मान्य व बंधनकारक राहतील, तसेच जमीनीबाबत करारनामा करणेसाठी बोलावणेत येईल, त्यावेळी कार्यालयात हजर राहुन करारनाम्यावर सहया करण्यात येतील, अशा आशयाचे हमीपत्र रु. २०/- च्या मुद्रांक शुल्क कागदावर करुन या कार्यालयात सादर करणेस कळविण्यात आले होते.

संस्थेने त्यांचे उपरोक्त दिनांक ७/५/२००८ अन्वये सवलतीची कब्जेहक्काची रक्कम रुपये ९५,४४,५६१/- या कार्यालयात दि महाराष्ट्र स्टेट को.ऑ.लि.फोर्ट,मुंबई शाखेच्या डिमांड ड्राप्ट क्रमांक १५०३२५, दिनांक ७/५/२००८ अन्वये भरणा केली आहे. संस्थेची नोंदणी उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे करुन नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक एमयुएम/डब्ल्युएचई/एचएसजी/ (टीसी) /१४११९/२००८ - ०९ ची प्रत व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची यादी संस्थेच्या ठरावासह सादर केली आहे. तसेच जमीन मंजुरीबाबत निर्धारीत करण्यात येणाऱ्या अटी / शर्ती संस्थेस मान्य व बंधनकारक राहतील तसेच जमीनीबाबत करारनामा करणेसाठी बोलावणेत येईल, त्यावेळी कार्यालयात हजर राहुन करारनाम्यावर सहया करण्यात येतील, अशा आशयाचे हमीपत्र रु. ५०/- च्या मुद्रांक शुल्क कागदावर करुन या कार्यालयात सादर केले आहे.

संस्थेने उपरोक्त दिनांक ४/४/२००८ चे ज्ञापनातील शर्त क्रमांक १ प्रमाणे श्री.चंद्रकांत कृष्णा चव्हाण, सध्या राहत असलेले निवासस्थान त्यांचे आईचे नावे असलेबाबत भागधारकाचे प्रमाणपत्र व मेंटेनन्स भरणा केलेल्या पावतीची प्रत सादर केली आहे.

त्याअर्थी मौजे बांद्रा, ता. अंधेरी स.नं. ३४१, न.भू.क्र. ६२९/१२७५, क्षेत्र १०१९.९३ चौ. मी. हा भुखंड संस्थेस शासन ज्ञापन दिनांक ४/४/२००८ व शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलसीएस-०६०६/प्र.क्र.

५४/ज-१ दि. २५/५/२००७ सोबतचे जोडपत्र ब मधील अटी आणि क्र. जमीन-१०/२००३/प्र.क्र. ४०१/ज-१, दि. २५ जुलै ०७ मधील अटी तसेच जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी/ शर्तीसह काही अतिरिक्त अटीवर प्रदान करण्यास तसेच शासन ज्ञापनासोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या संस्थेच्या सभासदांच्या सभासदत्वास सोबतच्या जोडपत्राप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

**अटी :**

१) संस्थेमध्ये संस्थेच्या एकूण सदस्य संख्येच्या ३ % सदस्य अंध/अपंग प्रवर्गातून समाविष्ट करणे अनिवार्य राहील.

२) सभासदांच्या उत्पन्नगटाप्रमाणे अनुज्ञेय क्षेत्रानुसार संस्थेमध्ये भविष्यात समाविष्ट करण्यात येणाऱ्या नवीन सभासदांची पात्रता शासनाच्या दि. २५/५/०७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तपासून सभासदांच्या सदस्यत्वास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची मान्यता घेणे आवश्यक राहिल.

प्रभारी जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
चेअरमन / सेक्रेटरी
सिंधुरत्न सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.)
व्दारा ३२, जस्मिन सहकारी गृहनिर्माण संस्था,
कालेलकर मार्ग, बांद्रे (पु.),
मुंबई ४०० ०५१.

**प्रत :**

१) मा. अपर मुख्य सचिव ( महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

२) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई ठाणे ४०० ६१४ यांना माहितीसाठी सादर.

३) तहसिलदार अंधेरी / नगर भुमापन अधिकारी बांद्रे / उपनिबंधक सहकारी संस्था एच (पूर्व) विभाग, बांद्रे (प.) मुंबई यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
२/- त्यांनी संस्थेस मंजूर जमीनीचा ताबा देऊन अधिकार अभिलेख अद्ययावत करावेत. व ताबेपावती, नकाशा व सुधारीत मिळकत पत्रिकेसह पुर्तता अहवाल सादर करावा.

४) उपनिबंधक सहकारी संस्था ( एच/पूर्व ) विभाग, सहकार बझार इमारत, ४ था मजला, बांद्रे रेल्वे स्टेशनसमोर, बांद्रे (प.) मुंबई ४०० ०५० यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

प्रभारी जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा



3a-ws-281-1-kvb